# परिशिष्टे

- विश्वास पाटील यांची मुलाखत
- संदर्भसूची

## १. विश्वास पाटील यांची मुलाखत :–

एका दशकाच्या अवधीत विविध भारतीय भाषांमध्ये पोहोचलेला ऐन चाळीशीतला एकमेव तरुण मराठी लेखक म्हणून विश्वास पाटील यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या नावावर पाच कादंबऱ्या व एक नाटक आहे. त्यापैकी ''पानिपत'' व ''रणांगण'' या कादंबरी व नाटकाचा तुलनात्मक अभ्यास एम.फिलच्या निमित्ताने मला करावयास मिळाला हे माझं भाग्यच! या अभ्यासाच्या निमित्ताने विश्वास पाटील यांची जरागनगर (कोल्हापूर) येथे घेतलेली मुलाखत.

प्रश्न : एक लेखक म्हणून आपली जडण–घडण कशी झाली?

उत्तरः माझं गाव अगदी छोटं खेडं. वस्ती असेल हजार–बाराशे! पण सातवीपर्यंत शाळा होती. तिथंच माझं प्राथमिक शिक्षण झालं. लहान असल्यापासून मला सुट्टीत गुराख्याचं काम करावं लागायचं त्यामुळे निसर्गाशी माझा घनिष्ट संबंध आला. वडील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते असल्यामुळे घरात नेहमीच राजकारणावर चर्चा होत. लहानपणापासून त्या मला ऐकायला आवडत.

खरं म्हणजे माझं सगळं बालपण, माझ्या गावानं–घरानं मला जी पार्श्वभूमी दिली ती माझ्या सगळ्या लेखनाची शिदोरी ठरली!

गुरे राखताना प्रचंड पाऊस म्हणजे काय असतो तो मी अनुभवला. आमच्या गावात अक्षरशः अंगाला मोड फुटावेत, तसा पाऊस पडतो. त्या पावसाचा अनुभव मी चिंब होऊन घेतला. आमच्या वारणा नदीला तेंव्हा पूर यायचा. तो आम्हाला महापुरासारखा भासायचा.

आता मला वाटतं की, कॉनरेड सारखे जे पाश्चात्य लेखक आहेत त्यांना त्यांच्या भूमीतील निसर्गाचं जसं देणं दिलं तसंच देणं मला या आमच्या नेर्ले गावांकडून मिळालं.

प्रश्नः लेखक होण्यासाठी किंवा लेखक म्हणून कोणाचे व कोणते संस्कार उपयोगी पडले?

उत्तरः आमच्या गावांत मला जसं निसर्गाचं देणं दिलं तसंच मला साहित्यकृतीच्या आकृतीबंधाचं, रचनेचं भानही नकळत मला आणून दिलं. काय व्हायचं त्यावेळी तरी आमच्या गावात शिकलेली फारशी माणसं नव्हती. माझ्या वर्गात तर मी धरुन फक्त पाच पोरं. श्रावण महिन्यात आमच्या घरात ग्रंथ लावला जायचा. तो ग्रंथ वाचायचं काम मला करावं लागायचं. त्यामुळे एखाद्या साहित्यकृतीचा प्लॉट किती गुंतागुंतीचा, अवाढव्य असतो, याचं भान मला आलं होतं. त्या वाचनाची सुरुवात जरी जबरदस्तीनं करुन घेतली असली तरी त्यात मी हळूहळू रंगून गेलो होतो हे मात्र खरं. त्यातून मला वाटतं माझ्या मनात कुठंतरी रचनेचं बीजारोपण होत गेलं असावं.

प्रश्नः लेखक म्हणून लेखनाची सुरुवात कशी झाली?

उत्तरः १९७५ ला 'कायदा' नावाची कथा दै'तरुणभारत' च्या वासंतिक अंकात प्रसिद्ध झाली. येथूनच पुढे माझ्या साहित्याचा लेखप्रपंच सुरु झाला. इयत्ता १० वीच्या वर्गात असताना लिहलेल्या या कथेला १०० रुपयाचे बक्षीस मिळाले. पुढे कॉलेजात गेल्यावर 'बिल्वदल' अंकातून 'भाकरीची कथा', 'मराठा' दिवाळी अंकातून 'दिशा'. विद्यापीठाच्या अनुदानातून 'आंबी' कादंबरी व 'कलाल चौक' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाले. महाविद्यालयात असतानाच 'क्रांतिसूर्य' ही नाना पाटील यांच्यावरील कादंबरी लिहली मात्र विशेषत्वाने कुणाचे तिच्याकडे लक्ष वेधले गेले नाही. त्यानंतर मग मी 'पांगिरा' लिहली पण 'पांगिरा'च्या अगोदर 'पानिपत' प्रसिद्ध झाली. पुढे 'झाडाझडती', 'महानायक' व 'रणांगण' हे नाटक प्रसिद्ध झाले अजूनही खूप लिहावसं वाटतं पण वेळ मिळत नाही.

प्रश्नः लेखनाच्या सुरुवातीच्या काळातच एका ऐतिहासिक महाकादंबरीकडे कसे वळलात?

उत्तरः तसं भव्य, उदात्त गोष्ट बघितली, थोर व्यक्तीबद्दल काही वाचलं की मी भारावून जात असे. त्याचप्रमाणे लेखक व्हावं असंही वाटत असे.

त्यावेळी जवळच चंद्रकुमार नलगे लेखक राहत होते. तसेच अण्णाभाऊ साठे होते. त्यांना त्यावेळी चांगली प्रसिद्धी मिळाली होती. त्यांची ती लोकप्रियता पाहून मला ही लेखक व्हावसं वाटू लागलं होतं.

त्या काळात इतिहासाची ओढही वाटत होती. किशोरवयात अशा वेड्या धाडसाचं कौतुक असतं. फार मोठं आकर्षणही असतं. आमच्या गावाजवळ विशाळगड, पन्हाळगड आहेत. त्यांच्या हकिकती मी ऐकत होतो. अण्णाभाऊं च्यामुळे त्या भागात पोवाडेही ऐकले. ऐकवले जात होते. लावण्यातर होत्याच. खंजिर, डफ यांचे आवाज कानी येणे ही नित्याची बाब होती. त्यामुळे मनात वीरश्री संचारल्यासारखा भास होई. इतिहासाची ओढ वाढतच चालली.

आमच्या देवळासमोर एक पडवी होती. पडवीवर पत्रा होता. आमची शाळा तिथंच भरायची. पत्र्यावर पडणाऱ्या पावसाच्या आवाजात मला कुठेतरी घोड्यांच्या टापांचाही आवाज मिसळला आहे असं भासत असे. पावसातून जाणारे घोडे कसे धावतील याचं चित्र मी तेंव्हा मनाशी रेखाटलं असावं.

'पानिपत'च्याच बाबतीत जर म्हणाल तर रियासतकार गो.स. सारदेसाई यांच्या रियासतीच्या खंडात पानिपतवरील पन्नास–साठ पानांचं प्रकरण आहे तो खंड माझ्या वाचनात आल्यानं (उठून बागेत चालत चालत) याला मराठी माणसाच्या गुणाची व दुर्गुणांची निशाणी मला त्यात सापडली. पुढे या विषयावर आपण कधीतरी लिहू असं ठरवलं... परंतू हा प्रसंगच मराठी माणसाच्या बाबतीत खूप बोलका होता. त्यामुळे या कादंबरीच्या लेखनाला सुरुवात केला.

प्रश्नः कादंबरी आणि इतिहास (कादंबरीतील वास्तव आणि ऐतिहासिक सत्य) यामध्ये आपण कोणता फरक मानता?

उत्तरः (बागेतील वेली नीट भिंतीवर चढवीत) इतिहासात दस्तऐवज, माहिती, सनावळी, तहाच्या अटी त्यांचे तपशील असतात. कादंबरी जीवनाचा परिघ मानणारी असते. पात्र वातावरण यांना ज्विवंत

रुप दिलेलं असते. थोडक्यात, इतिहासातील नोंदी सुष्क असतात त्याना जीवंतपणा कादंबरीत द्यायचा असतो.

प्रश्नः 'पानिपत' कादंबरी लिहताना ऐतिहासिक सत्याला मुरड घालावी लागली काय? किंवा कादंबरी रंजक करण्यासाठी ऐतिहासिक तडजोड करावी लागली काय?

उत्तरः ऐतिहासिक कादंबरी लिहणे खूप जिकीरीचे व अवघड काम असते. डोंबाऱ्याचे पोर जसे तारेवरुन कसरत करताना त्याला हातातील काठी संभाळायची असते, तोलही संभाळायचा व जीवही संभाळायचा असतो आणि त्यातून लोकांची करमणूकही करावयाची असते. तसेच हा लेखन प्रकार आहे. ऐतिहासिक वास्तवाशी प्रतारणा करुन चालत नाही व लोकांची करमणुकही करायची असते. असा हा लेखन प्रकार! मात्र आवश्यक असेल तर काल्पनिक पात्रे वापरा, परंतु त्याला ऐतिहासिक सत्याचा भास हवा.

'पानिपत' लिहताना मला काल्पनिक पात्राबरोबर काल्पनिक घटनाही घ्याव्या लागल्या नाहीत. कारण ते सत्यच ऐवढं भयंकर होतं ही त्यासाठी काल्पनिक घटना रंगवाव्या लागल्या नाहीत. आणि एक मात्र खरे पानिपतचा इतिहास खरा होता, त्यामुळे मला थोडीशी इतिहासाकाराची भूमिका स्विकारावी लागली. '

आजपर्यंत भाऊसाहेबांचं व्यक्तिचित्र हिरो असूनही खलनायक ठरवलं होतं. संशोधनात माझ्या असं लक्षात आलं की, भाऊसाहेबांविषयी जे काही लिहलं आहे ते खरं नाही. त्यासाठी भाऊसाहेबांविषयी ते–ते शोधून मी त्याच चित्र रेखाटलं. भाऊसाहेबांविषयी जे काही इतिहासाला माहित नव्हतं ते मी सर्वसामान्यांसमोर आणलं.

या संशोधनात प्रामुख्यानं मला रियासतकार देसाई यांचा १९३३ च्या 'हितचिंतक'च्या मासिकातील 'भाऊसाहेबांच्या जीवनवृत्तांतातील धागेदोरे' लेखाची मदत झाली. हा लेख वाचताना कादंबरीची दिशा मला मिळाली.

प्रश्नः 'पानिपत' कादंबरी लेखनामागील प्रेरणा?

उत्तरः मघाशी सांगितल्याप्रमाणेच! आजपर्यंत मी जो विचार करीत होतो की, मराठी माणसाचे गुण आणि दोष त्यांचा कमकुवतपणा, त्यांची प्रगती का होत नाही? हा माझ्या चिंतनाचा विषय होता. त्यामुळे पानिपतचे युद्ध हे मला परफेक्ट वाटले. – इतिहासातील हा जो प्रसंग आहे तो मराठ्यांचे सर्वोत्कृष्ट गुण, दुर्गुण यांची सुंदर निशाणी आहे. आणि हिच प्रेरणा आहे. यासाठी वेगळी कुणी प्रेरणा दिली असं काही नाही.

प्रश्नः कादंबरीचे नाट्यरुपांतर करण्यामागील कारण?

उत्तरः कादंबरी घरातून रणावर नेली पाहिजे नी युद्धभूमीला नायकत्व दिलं पाहिजे. दुसरं असं, माझ्या या कादंबरीमध्ये तीन फॉर्म्स आहेत. कादंबरी, प्रवासवर्णन आणि रणांगणावरील नाट्य पण कादंबरीचं पूर्ण नाटक होईल असं वाटलं नव्हतं. त्याचं सर्व श्रेय मोहन वाघांना द्यायला हवं. 'ला मिझरेबल' हे फ्रेंच राज्यक्रांतीवरचं नाटक वाघांनी पाहिलं नी ते म्हणाले– 'त्या राज्यक्रांतीवर नाटक होऊ शकतं तर पानिपतवर का नाही?... ' त्यांचा हा प्रश्न खारोखरच विचार करण्यासारखा होता. नाटकाचे दिग्दर्शक वामन केंद्रे यांना ही या प्रश्नाने विचार करायला प्रवृत्त केले. त्यांनाही खारोखार वाटले पानिपत विषयात खारोखार चॅलेंजिंग काहीतरी आहे. मग त्यांनी कादंबरी वाचली आणि मला फोन केला... 'मला कादंबरीच्या पानापानावर नाटक दिसत आहे' या त्यांच्या सांगण्यावरुन मग मी त्यांना उलट विचारलं– 'कादंबरीत काय आहे?' त्यावर त्यांनी सांगितलं 'मला ही कादंबरी, कादंबरी म्हणून वाटत नाही, तर ... ती मला मराठी माणसाच्या वृत्तीचं आणि प्रवृत्तीचं नंग दर्शन आहे असं वाटतं आहे.' ज्या प्रेरणेनं ती कादंबरी लिहली होती तिच प्रेरणा मला वामनच्यात दिसली. आणि मग मी त्याला सांगून टाकलं चल वामन तुझं माझं जमलं. आपण या विषयाला

हात घालायला काही हरकत नाही. आणि मी नाटक लिहायला घेतलं. नाटक लिहायला घेतलं. पण ती दोन–अडीच तासाच्या साच्यात बसवायचं कसं ? ही प्रमुख अडचण होती. मी नाटक लिहीत होतो. वामनशी चर्चा करीत होतो यातून नाटक उलगडत गेलं.

प्रश्नः कादंबरीतील अनुभव आणि नाटकातील अनुभव यात फरक मानता का? हे अनुभवांतर करताना विषयाचा तोल कसा साधला?

उत्तरः हो, कादंबरीतील अनुभव व नाटकातील अनुभव यात स्वाभाविक फरक पडतोच. नाटकातील विषयाच्या अनुभवाला नाही म्हटलं तरी मर्यादा पडतात. नाटक कमी वेळेत मर्यादित जागेत बसवायचे म्हणजे मर्यादा पडतातच. एवढ्या मोठ्या विषयावर लिहायचे म्हणजे काही भाग पुन्हा–पुन्हा लिहावा लागला. दिल्ली दरबारातील सोहळा हा सीन मी तर १७ वेळा लिहला. आणि हा सीन मी सर्व नाटक लिहून झाल्यावर लिहला... परंतू तो नाटकाची पताका ठरली...

नाट्यरुपांतर करताना सुरुवातीला नाटकाचा फॉर्म सापडत नव्हता. फार्मच्या दृष्टीने खूप ओढातान होत गेली. कादंबरी उभी आडवी करुन खूप विचार केला मग मुसलमान कादंबरीचं घडून गेलेल्या पानिपतच्या इतिहासाची–त्याच्यातील सदाशिवभाऊंच्या शौर्याची कहाणी सांगत आहेत हे सुचलं. जे नाटकाचं बलस्थान आहे ते मला कादंबरीत आणता आलं. नजीबखान सलोख्याचा प्रसंग, अब्दालीबरोबर रुक्सार होती हे मला कादंबरी लिहल्यावर समजलं त्यामुळे ही व्यक्तिरेखा मला नाटकात आणता आली. कादंबरी एखाद्या प्रसंगासाठी अनेक पानं खर्ची करावी लागतात. परंतु नाटकात दृश्यात्मकतेचा फायदा खूप मिळतो. कादंबरीतील काही सीन नाटकात नाहीत पर्यायी असे नाटकात दुसरे सीन योजून विषयाचा तोल संभाळावा लागला आहे. मी तर असे म्हणेन कादंबरीचं नाटकात रुपांतर एका बेचैनीतून झालं.

प्रश्नः कादंबरीचा विस्तार आणि नाटकाच्या मर्यादा यांची सांगड घालताना विषयावर अन्याय करावा लागला का?

उत्तरः नाटकामुळे विषयाला न्याय मिळाला असं मला वाटतं. मी जे चॅलेंज म्हणून नाटक स्विकारलं ते मी चॅलेंज पूर्ण जिंकलो.

९ वर्षानंतर मी नाटक लिहायला घेतलं... माध्यमांतर होतं... म्हणजे कादंबरीचं नाटक किंवा नाटकाची कादंबरी हे माध्यमांतर होताना तेवढी तटस्था यावी लागते. त्यासाठी नियोजन महत्वाचं असतं. त्यासाठी काही काळ होणं महत्वाचं असतं... त्यासाठी मला ९ वर्षे वाट पाहवी लागलो. कादंबरीनंतर मी लगेच नाटक लिहायला घेतलं असतं तर ... तीच ती वाक्ये पुन्हा–पुन्हा नाटकात आली असती. कादंबरी वाचतानाचा जो अनुभव आहे तोच अनुभव नाटक पाहताना आला असतो. त्यासाठी कादंबरी विसरावी लागली. म्हणून कदंबरीत नाहीत असे दोन सीन मला नाटकात घेता आले.

प्रश्नः 'पानिपत' व 'रणांगण' दोन्ही कलाकृती विषय एकच पण प्रेरणा एकच की भिन्न?

उत्तरः मघाशी सांगितल्याप्रमाणे दोन्ही कलाकृतीची निर्मिती प्रक्रिया जरी वेगवेगळी असली तरी मराठी माणसाची वृत्ती, प्रवृत्ती यांचं दर्शन याच प्रेरणा दोन्ही कलाकृतीमागे आहेत.

प्रश्नः 'रणांगण' नाटकाद्ववारे या विषयाला परिपूर्ण न्याय मिळाला असे वाटते का? जर याचे उत्तर होकारार्थी असेल तर महाकादंबरीची गरज किंवा अपरिहार्यता आहे का?

उत्तरः होय, मला तरी वाटतं. 'रणांगण' नाटकाने पानिपत विषयाला न्याय मिळाला आहे. नाटक पाहिल्यावर माणूस खारोखरच विचारप्रवृत्त होतो. त्याच्या डोक्यात उठणारी वादळं आपल्याकडील वृत्तीच्या काहीतरी निर्देश करीत राहतात.

नाटक आणि कादंबरी या दोन्ही वेगवेगळ्या कलाकृती आहेत. माझ्या मते या दोन्ही वाङ्मयप्रकाराची बलस्थाने, स्वभाववैशिष्ट्ये वेगळी आहेत. सर्वसामान्य वाचकांनी 'पानिपत'ची पारायणे केली आहेत. तीन तासाचे नाटक पाहून लगेच संपते पण प्रदीर्घ कादंबरीचा आस्वाद घेण्याची गोडी काही वेगळीच असते.

प्रश्नः (आणि शेवटचा प्रश्न) कादंबरी वाचताना परिणाम आणि नाट्य प्रयोगाचा परिणाम यामध्ये आपल्याला अपेक्षित परिणाम कशामुळे साधला गेला?

उत्तरः कादंबरीचा परिणाम साधण्याची सर्वस्वी जबाबदारी लेखकाची असते. विशेषतः ऐतिहासिक कादंबरी लिहताना त्याला फार भावनाविवश हाऊन चाल नाही. कादंबरीचा विषय, आशय यांचा समतोलपणा साधावा लागतो तर नाटक ही सांघिक प्रक्रिया असल्याने तिथे सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. त्यादृष्टीने नाटकाचा परिणाम साधला जातो. नाटक ही शेवटी एकट्या लेखकाची निर्मिती असली तरी अपेक्षित परिणाम साधण्यासाठी त्याला इतरांच्यावर अवलंबून राहवे लगते. त्यादृष्टीने नाटकाचे दिग्दर्शक, नेपथ्यकार, संगीत, वेशभूषा, केशभूषा यातून परिणाम साधला जातो.

प्रश्नः (आता एकच) तुम्ही कोणत्याही विषयाचा सलोख अभ्यास करता. सामान्यपणे संशोधनाचा मार्ग चोखाळणारा साहित्यक म्हणून आपणांस ओळखलं जातं. संशोधन, व्यासंग ही ललित साहित्याची वाट नसते असे लोक मानतात मात्र तुम्हाला अशा अभ्यासाची आवश्यकता का वाटते?

उत्तरः आपण जे लेखन करतो त्यातील प्रत्येक तपशील निर्दोष, परिपूर्ण असावा असा माझा प्रयत्न असतो. 'पानिपत' आणि 'महानायक' कादंबऱ्यांच्या लेखनाच्यावेळी मला हे सारा तपशील समजावून घेण्यसाठी बरच वाचन करावं लागलं. मी बरेच दौरे केले. ज्या–ज्या ठिकाणी यातील घटना घडल्या त्या–त्या ठिकाणी भेट देण्याचा मी शक्य तेवढा प्रयत्न केला. शिवाय माझा असा अनुभव आहे की, आपण त्या–त्या स्थळाला प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे. तत्संबंधित लोकांना भेटलो. लोकांना भेटणं जसं महत्त्वाचं होतं तसंच अस्सल ऐतिहासिक साधनांसाठी वापर करणं आवश्यक होतं.

'पानिपत'च्या लेखनाआधी मनात विषय पक्का झाल्यावर मी पानिपतवर प्रत्यक्ष गेलो. त्यावेळी माझ्या अंतःचक्षूनी ती मराठ्यांची लढाई प्रत्यक्ष पाहिली. माझ्या अंगावर रोमांच उभे

राहिले. तिथल्या आजूबाजूच्या खेड्यामधून हिंडताना वेगवेगळ्या माणसांना भेटताना भाऊसाहेब पेशव्यांच्या पराक्रमाच्या गाथा प्रत्यक्ष ऐकता आल्या. पानिपतची खरी ओळख मला प्रत्यक्ष पानिपतवर झाली. त्याचा हत्ती प्रत्यक्ष झुंजताना दिसला. त्याचबरोबर मराठ्यांची वृत्ती! अशीच गोष्ट 'महानायक'च्या वेळी आणि 'झाडाझडती'च्या वेळीही घडली.